**MHAH080000442025**

<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २२/२०२५ मधील नि. ३० वरील आदेश</u>

*(सुभाष प्रभाकर बेलापुरकर विरुद्ध रजीन विश्वनाथ बेलापुरकर वगैरे)*

प्रतिवादी क्र.२१ यांनी प्रस्तूतचा अर्ज हा त्यांचे तर्फे दाव्यास म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळावा याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. २१ हा वेळेत व मुदतीत वकिलपत्र देवुन हजर झाला. परंतु, दरम्यानच्या काळात सदर दाव्यात कैफियत व म्हणणे देणेकामी आवश्यक असलेली महत्वाची माहिती व वादीने दाव्यात नमुद केलेली कागदपत्रे वेळेत व मुदतीत उपलब्ध होवु न शकल्यामुळे तसेच, प्रतिवादी क्र. २१ हा आजारी असल्याने सदर दाव्यात कैफियत देवु शकला नाही. तरी सदर दाव्यात कैफियत देणेकामी झालेला उशिर माफ होवुन मिळावा अशी विनंती प्रतिवादी क्र. २१ केली आहे.

**०२.** वादी यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून कथन केले आहे की, सदरील अर्जातील मजकुर खोटा व बनावट असुन त्यातील विधाने काल्पनिक आहेत. प्रतिवादीने जाणुन–बुजुन दाव्याचे काम लांबणीवर पडावे म्हणुन उशिरा कैफियत दिली आहे. प्रतिवादींचा अर्ज रद्द करण्यात यावा. यदाकदाचीत प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणेचा झाल्यास दंड आकारून मंजूर करणेची विनंती केली आहे.

**०३.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींनी विहीत मुदतीमध्ये कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादीचे म्हणणे ऐकणे व त्यांना संधी देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. सबब, सदर अर्ज न्यायाच्या हितार्थ मंजूर करणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब हा प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रु.२००/– असा खर्च देवून विलंब माफ करणेत येतो. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>–आदेश–</u>**

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज (नि.३०) खर्चासह मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | प्रतिवादी क्र. २१ यांनी वादीस रक्कम रु. २००/– खर्च दयावा. |
| **३.** | वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.07.01 10:31:47 +0530

संगमनेर

दि. ३०/०६/२०२५.

**(सौ.एस.बी.ढवळे.)**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.